## जलसंवाद मासिकः उद्देश व वाटचालः

१) मी डॉ. दत्ता देशकर, एक निवृत्त प्रचार्य. कधी काळी आपण पाण्याच्या क्षेत्रात काम करू असे स्वप्नातही नव्हते. मी एक वाणिज्य व अर्थशास्त्राचा विद्यार्थी. माझा जलशास्त्र वा भूगर्भ शास्त्राशी दूरान्वयानेही संबंध नव्हता.

२) एका सभेत जागतिक ख्यातीचे जलतज्ज्ञ डॉ. माधवराव चितळे यांचे पाणी या विषयावरील एक भाषण ऐकले. आणि तेच माझ्या जीवनाला दिशा देणारे ठरले. त्या भाषणाने मी इतका प्रभावित झालो की मी माझे उर्वरित आयुष्य पाणी प्रश्नावर खर्च करण्याचा निश्चय केला.

३) त्यांच्याच कार्यालयात (Global Water Partnership- South Asia) त्यांचेबरोबर कार्यालयीन समन्वयक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. मी दोन वर्ष त्यांचेबरोबर काम केले. या दोन वर्षात पाण्याबद्दल मला इतकी माहिती मिळाली पाणी हा विषय मला नवीन राहिला नाही. या विषयात मी पारंगत झालो असा माझा आजही दावा नाही. पण पाणी या विषयाचा अभियांत्रिकी बरोबरच अर्थशास्त्र, समाजशास्त्र व व्यवस्थापन शास्त्र यांचा फार घनिष्ट संबंध आहे ही बाब माझ्या लक्षात आली. हाच धागा पकडून मी आज जलक्षेत्रात कार्य करीत आहे.

४) दोन वर्षांनंतर हे कार्यालय बांगला देश मध्ये स्थलांतरीत झाले व माझा या कार्यालयाशी संबंध संपला. पण पाणी विषय आता सोडायचा नाही हे ठरवूनच नी पुढील कार्याला लागलो. तेव्हापासून समाजाला जलसाक्षर करण्याचे व्रत घेतले. शाळांमध्ये, महाविद्यालयांत, सामाजिक संस्थांत मी पाणी विषयावर प्रबोधन करु लगालो.

५) जलसाक्षरतेचे हे व्रत जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पाणी या विषयावर एक मासिक काढायचा निर्णय घेतला. व  जानेवारी २००५ पासून हे मासिक मी प्रकाशित करीत आहे. तेच हे जलसंवाद मासिक.

६) जलसंवादच्या प्रत्येक अंकात पाणी विषयावरील पाच ते सहा लेख, पाण्यावरील एक यशोगाथा, जल क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांचा परिचय, देशातील व परदेशातील नद्या, धरणे व सरोवरे यांचा परिचय, पाण्यावरील जागतिक व देशाअंतर्गत महत्वाच्या बातम्या, कविता, व्यंगचित्रे इत्यादींचा समावेश असतो. अंक वाचनीय व्हावा यासाठी प्रयत्न केले जातात.

७) आतापर्यंत जलसंवादने पाण्याशी निगडित एखादा विषय घेवून ५० चे वर विशेषांक प्रकाशित केले आहेत. त्या अंकांची यादी इतरत्र देण्यात आली आहे.

८) पाणी प्रश्नाशी निगडित एखाद्या विषयांबद्दल सखोल चिंतन करता येत नाही ही बाब लक्षात येताच दरवर्षी एक विशिष्ट विषय घेवून त्यावर योग्य मंथन घडवून आणण्यासाठी जलोपासना नावाचा दिवाळी अंक प्रकाशित केला जातो. आता पर्यंत हाताळलेले  विषय जलसाक्षरता, पाणी आणि दुष्काळ, शुष्क व प्रदूषित नद्यांचे आक्रोश, सरोवर संवर्धन व भूजल संवर्धन हे आहेत. सदर अंकही या वेबसाइटवर वाचकांना वाचायला मिळतील. या कामात अतिथी संपादक म्हणून डॉ. क्षमा

खोब्रागडे आणि श्री. शशांक दोशपांडे यांनी हातभार लावला. त्यांचे ऋण व्यक्त करणे जलसंवाद मासिकाचे कर्तव्यच आहे.

९) पाणी प्रश्नासारखा अवाढव्य विषय एका हाती आटोपणार नाही ही बाब लक्षात येताच श्री. प्रदीप चिटगोपोकर, श्री. सुनील जोशी, श्री. मुकुंद धाराशिवकर व श्री. प्रवीण महाजन यांनीही आतापर्यंत संपादन कार्याला हातभार लावला या बद्दल जलसंवाद त्यांचे ऋण व्यक्त करते.

१०) जलसंवाद मासिक हे भारतीय जल संस्कृती मंडळ या संस्थेचे मुखपत्र आहे. या मंडळाने ठरवून दिलेली ध्येय धोरणे यांचा जलवसंवाद मासिक अंगीकार करते. या मंडळाचा अनुग्रह म्हणून दरवर्षी जागतिक जलदिनाचा विशेषांक मंडळ पुरस्कृत करते. सुरवातीचे काळात मंडळाचे आश्रयदाते डॉ. माधवराव चितळे व न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांनी मासिकाला योग्य मार्गदर्शनही केले म्हणूनच जलसंवाद आपली प्रगती शकला याची आम्हाला जाणीव आहे.

११) जलसंवाद मासिक नियमित पणे चालावे, त्याला कोणतीही आर्थिक झळ पोहोचू नये हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून श्रीमती वसुधा महाबळ, श्री. हर्षवर्धन चितळे, श्री. प्रदीप चिटगोपेकर मित्रमंडळ आणि श्री. शामराव नाईक यांनी भरघोस आर्थिक सहाय्य दिले. त्यांनी दिलेली आर्थिक मदत भारतीय जलसंस्कृती मंडळात ठेवींच्या स्वरुपात सुरक्षित आहे. मंडळ दरवर्षी त्यावरील व्याज मासिकाकडे वर्ग करते व त्यातून मासिकाचा बराच खर्च भागविला जातो. जलसंवाद या सर्व दात्यांचे ऋण व्यक्त करते.

१२) एक नियमित लेखकवर्ग तयार करण्याचे श्रेय जलसंवाद मासिकाला निश्चितच जाते. पाणी क्षेत्रातील विचारवंतांना लिहिते करण्यासाठी जलसंवाद मासिकाने करोशीने प्रयत्न केले. त्याचे यश म्हणून गेल्या १४ वर्षात मासिकाला लेखांचा तुटवडा कधीच जाणवला नाही. भविष्यातही त्यांचे सहकार्य असेच मिळत राहील याची जलसंवादला खात्री आहे.

१३) जलसंवाद मासिकाने आतापर्यंत पाणी या विषयावर विविध लेखमाला चालविल्या आहेत. देशोदेशीचे पाणी, विविध ग्रंथांत पाणी प्रश्नाचा घेतलेला मागोवा, प्राचीन ग्रंथात हाताळलेले पाणी, पाणी आणि विद्यार्थी जगत, नदी प्रदूषणावर नियंत्रण, महाराष्ट्रातील विविध भागात जल संचयाचे यशस्वी प्रयोग, राजस्थानकी रजत जलबूंदे या श्री. अनुपम मिश्रा लिखित पुस्तकाचे मराठीत श्रीमती प्रज्ञा सरखोत यांनी केलेले भाषांतर, वारसा पाण्याचा या विषयावर डॉ. दि. मा. मोरे यांची २५ भागात विभक्त मालिका, डॉ. माधवराव चितळे यांची जलतरंग नावाची २५ भागांची मालिका, श्री. शशांक देशपांडे यांची प्रश्न भूजलाचा या विषयावरील मालिका ही खास आकर्षणे ठरली आहेत.

१४) शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांत, समाजात जलसाक्षरता हा विषय चांगला भिनावा यासाठी दरवर्षी चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा घेणे , जागतिक जलदिनानिमित्त जलदिंड्यांचे आयोजन करणे, मासिकातील उत्कृष्ट लेखांना पारितोषिके देणे यासारखे कार्यक्रम मासिकातर्फे नियमितपणे राबविले जातात.

१५) जलसाक्षरता जास्त लोकांपर्यंत पोहोचावी म्हणून १५ जून २०१८ पासून जलसंवाद मासिकाने जलसंवाद वेब रेडीयोपण सुरु केला आहे. हा रेडियो सर्व जगभर ऐकता येतो. या केंद्रावर दिवसरात्र कार्यक्रम चालू असतात. यासाठी Jalasamvad radio नावाचे ॲप तयार करण्यात आले आहे. ते आपल्या मोबाइलवर वा संगणकावर डाउनलोड केल्यास आपणही या सोयीचा विनामूल्य लाभ घेवू शकता. पाण्यावरील भाषणे, चर्चा, मुलाखती, जलक्षेत्रातील यशोगाथा, गाणी, कविता, नाटके, प्रश्नोत्तरे अशा विविध कार्यक्रमांची योजना या रेडियेवर करण्यात आली आहे.

१६) जलसंवाद मासिकातर्फे चला जलसाक्षर होवू या, बळीराजा सावध हो, दुष्काळ भेडसावतोय, गणित पाण्याचे, चला, भूजल पुनर्भरण करु या, हिसाब किताब पानीका, तुझे आहे तुजपाशी– पाणी जमवा हावरटपणे, वापरा मात्र विवेकाने या डॉ. दत्ता देशकर लिखित पुस्तिका प्रकाशित करण्यात आल्या. त्यांचे विनामूल्य वाटप करण्यात येत असते. त्या पुस्तिकाही आपल्याला सदर वेबसाइटवर वाचता येतील.

धन्यवाद.

डॉ. दत्ता देशकर

संपादक